दैनिक
सकारात्मक विचारांचे
# आनंद नगरी
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी एकसमाने प्रकाशित होणारे मराठी दैनिक

Sunday 2024/07/28

## देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना.

(नोंदणी क्र. जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर.(सी.आर.)३१६ दि. ०२/०६/१९९०)
मुख्य कार्यालयः टाऊन हॉल जवळ, कचेरी रोड, जुना जालना मो.९११२२१४०९९
कार्यक्षेत्रः छत्रपती संभाजीनगर विभाग

### ३५ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
### (फक्त सभासदांसाठी)

संस्थेची ३५ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ११/०८/२०२४ रोजी रविवार सकाळी १०.३० वा. सभागृह मातोश्री लॉन्स, अंबड रोड, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेत पुढील प्रमाणे कामकाज होईल. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :-**

१. मागील दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ३४ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संचालक मंडळाने सादर केलेल्या २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या अहवालाचे वाचन व त्यास मंजुरी देणे.
३. दि. ३१ मार्च २०२४ अखेर पर्यंतच्या आर्थिक पत्रकांना मंजुरी देणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केल्या प्रकरणी सन २०२३-२४ या अहवाल काळात झालेला नफा विभागणीस मंजुरी देणे.
५. मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचा २०२३-२०२४ आर्थिक वर्ष अहवालातील दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.
६. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षिच्या संस्थेच्या लेखा परिक्षणासाठी सहकार खात्याच्या पॅनलवरील लेखा परिक्षकांच्या नियुक्तीस मंजुरी देणे.
८. मा. न्यायालय, लोकअदालत, सहकार न्यायालय निर्णयानुसार व इतर निवाड्यांमधुन केलेल्या तडजोडी तसेच निर्लेखित केलेल्या कर्जास मंजुरी देणे.
९. कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्तारास मंजुरी मिळणे बाबत.
१०. दि. ०४ ऑगस्ट २०२४ पर्यंत आलेल्या लेखी प्रश्नांना उत्तर देणे व सुचनांचा विचार करणे.
११. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ :-जालना

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
स्वाक्षरीत/-
कृष्णा के. चव्हाण
(व्यवस्थापक)

**सभासंदाना नम्र सुचना :-**

**१.** सभेस आवश्यक गणपुर्ती न झाल्यास ही सभा तहकुब करून त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व अशा सभेला गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.
**२.** ज्या सभासदांना काही प्रस्ताव अथवा सुचना मांडावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सुचना, प्रश्न अथवा प्रस्ताव दिनांक ०४/०८/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत लेखी कळवाव्यात, त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
**३.** ज्या सभासदांचा पत्ता बदलेला असेल त्यांनी आपला नवीन पत्ता, ई-मेल, Whatsapp मोबाईल क्रमांक संस्थेच्या कार्यालयात त्वरीत कळवावा.
**४.** सभासदांसाठी संस्थेचा ३५ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल कार्यालयीन वेळेत संस्थेत व संस्थेची वेबसाईट www.devgiripatsansthajalna.com वर उपलब्ध आहे.
**५.** सभेस येतांना अहवाल सोबत आणावा.
**६.** पतसंस्थेच्या सभासदांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ इयत्ता १० वी मध्ये ९०% पेक्षा अधिक गुण व १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षामध्ये ७५% पेक्षा अधिक गुण प्राप्त केले असतील किंवा त्याने इयत्ता ५ वी, ८ वी च्या शिष्यवृत्ती परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविले असेल किंवा क्रिडा, सांस्कृतिक अथवा कोणत्याही क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविले असेल त्यांची गुणपत्रिका अथवा प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रत संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, पालकांचे संपूर्ण नाव, सभासद क्रमांक, सभासद खाते असणाऱ्या शाखेचे नाव दिनांक ०४/०८/२०२४ संध्या ५.०० वा.पर्यंत संस्थेच्या कार्यालय किंवा आपल्या जवळच्या शाखेत जमा करावी ही विनंती.